सिंधुदुर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद,
गोंदिया, गडचिरोली, परभणी,
लातूर, सोलापूर व सांगली या
९ जिल्हयात शासकीय जिल्हा
ग्रंथालयांची स्थापना.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं १००४/(५४/०४)/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ४ डिसेंबर, २००४.

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं १०९९/५१०२५/(६९३)/ साशि-५, दिनांक २२ एप्रिल, २००४.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं १००३/(१६५/०३)/साशि-५, दिनांक ६ फेब्रुवारी, २००४.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक असंक १००१/प्र.क्र. २९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००४.

**शासन निर्णय :-** उपरोक्त क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मुंबई शहर, सातारा, बीड व नांदेड या चार जिल्हयात आणि क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये जळगांव, अहमदनगर, वाशिम, अमरावती, औरंगाबाद व हिंगोली या ६ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर उर्वरित ९ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना व त्याकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या आदेशान्वये १) सिंधुदुर्ग, २) नंदुरबार, ३)उस्मानाबाद, ४)गोंदिया, ५)गडचिरोली, ६)परभणी, ७)लातूर, ८)सोलापूर व ९) सांगली या उर्वरित ९ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्यात शासनाची प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

२. हे आदेश नियोजन विभाग / वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४७९/२००४/व्यय-५ दिनांक ३.११.२००४ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( स्मि. स. गोरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
कृ.मा.प.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः-मराग्रं १००३/(१६५/०३)/साशि-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

दिनांकः- ६ फेब्रुवारी, २००४.

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं १०९९/
५१०२५ /(६९३)/साशि-५, दिनांक २१ एप्रिल, २००३.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक-१००१/प्र.क्र.२९/
२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१

शासन निर्णयः- उपरोक्त क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मुंबई शहर, सातारा, बीड व नांदेड या चार जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली आहे. या जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर उर्वरित १५ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना व त्याकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सदर १५ जिल्हा ग्रंथालयांपैकी **१) जळगांव २) अहमदनगर, ३) वाशिम, ४) अमरावती, ५) औरंगाबाद व हिंगोली हया सहा जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालये** स्थापन करण्यास शासनाची प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

२. हे आदेश नियोजन विभाग / वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५/२००४/व्यय-५, दिनांक २९.१.२००४ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र.ग. पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर,
जिल्हा कोषाधिकारी, जळगांव, अहमदनगर, वाशिम,
अमरावती, औरंगाबाद व हिंगोली.

मुंबई शहर, सातारा, बीड व नांदेड या ४ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना-

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः-मराग्रं १०९९/५१०२५ /(६९३ )/साशि-५
मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांकः- २१ एप्रिल, २००३.

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं १०९६/१७९१८/(२८९)/साशि-५, दिनांक ७ ऑगस्ट, १९९७.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१

शासन निर्णयः- उपरोक्त क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना या आठ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली आहे. या जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर उर्वरित १९ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना व त्याकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सदर १९ जिल्हा ग्रंथालयांपैकी **१) मुंबई २) सातारा ३) बीड व ४) नांदेड हया चार जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालये** स्थापन करण्यास शासनाची प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. सदर चार जिल्हा ग्रंथालयांकरिता आवश्यक त्या पद निर्मितीच्या मंजुरीचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

२. हे आदेश नियोजन विभाग / वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७३१/२००२ व्यय -५ , दिनांक ४.३.२००३ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( पृ.सि. मालवणकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर,
जिल्हा कोषाधिकारी, सातारा, बीड व नांदेड,
वित्त विभाग (अर्थसं/व्यय-५)
नियोजन विभाग
उच्च व तंत्रशिक्षण विभाग (साशि-१)
निवड नस्ती (साशि-५)

ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना जिल्हयांत जिल्हा ग्रंथालयांची स्थापना...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः- मराग्रं १०९६/१७११८/(२८९)/साशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः-७ ऑगस्ट १९९७

वाचा:- शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक पूरक-१०९७/प्र.क्र. १०३/अर्थसंकल्प-३. दिनांक ३० जुलै, १९९७.

**शासन निर्णयः**-विदर्भ विभागात कार्यरत असलेल्या शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना या आठ जिल्हयांत शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सदर ग्रंथालये सध्या भाडयाच्या जागेत सुरू करण्यास, त्यासाठी खालील पदे निर्माण करण्यास व ती दिनांक २८.२.१९९८ पर्यत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी येणा-या रूपये ४०.०० लाख (रूपये चाळीस लाख फक्त) खर्चास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे:-

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या (एका ग्रंथालया-साठी) | पद संख्या (ग्रंथालयासाठी) |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | ग्रंथपाल गट "ब" | रू. २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | १ | ८ |
| २ | तांत्रिक सहाय्यक गट "ब" | रू. १६४०-६०-२६००-दरो-७५-२९०० | १ | ८ |
| ३ | मुख्य लिपिक गट "क" | रू. १४००-४०-१६००-दरो-५०-२३००-६०-२६०० | १ | ८ |
| ४ | वरिष्ठ लिपिक गट "क" | रू. १२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० | १ | ८ |
| ५ | कनिष्ठ लिपिक गट "क" | रू. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० | १ | ८ |
| ६ | शिपाई, गट "ड" | रू. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ | ८ |
| ७ | चौकीदार गट "ड" | रू. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ | ८ |
| | | एकूण | ७ | ५६ |

२.	ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून उपरोक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी. प्रस्तावित आठ शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या ग्रंथपालांना (गट ''ब'' ) या आदेशाद्वारे '' कार्यालय प्रमुख '' म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

३.	उपरोक्त बाबीवर होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यू-४ ''२२०५-कला व संस्कृती-१०५-सार्वजनिक ग्रंथालये-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-(दोन)(बी) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये '' या अर्थशिर्षाखालील १९९७-९८ या वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४.	हे आदेश नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३४२/व्यय-५, दिनांक ९.६.१९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( कुं. गु. बगाडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.	ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.	महालेखापाल महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३.	सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४.	जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना.
५.	नियोजन विभाग
६.	वित्त विभाग (अर्थसं) व्यय-५
७.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१)
८.	निवड नस्ती/साशि-५

पोळ १८२९८.

मुंबई उपनगर जिल्हा शासकीय ग्रंथालयाची स्थापना करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक:एलआरबी १०९५/३८३२/[२४/९५] मातशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २/११/९८

वाचा:- शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंदाज १०९६/प्र.क्र.१९२/ अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ जुलै, १९९६.

शासन निर्णय:- महाराष्ट्र राज्याच्या पुनर्रचनेच्या वेळी, पूर्वी मध्य प्रदेशात असलेल्या विदर्भ विभागातील आठ शासकीय जिल्हा ग्रंथालये वर्ग करण्यात आली. सन १९५५ साली मध्यप्रदेश सरकारने विदर्भातील सार्वजनिक ग्रंथालयांना "पुस्तकांचे संच पुरविणे" या प्रमुख उद्दिष्टाखालील "४-क" योजनेअंतर्गत असलेले विविध कार्यक्रम राबविण्यासाठी या ग्रंथालयांची स्थापना केली होती. मुंबई उपनगर जिल्ह्याची वाढती लोकसंख्या व साक्षरतेचे प्रमाण लक्षात घेऊन विदर्भ विभागातील सध्या कार्यरत असलेल्या शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर "मुंबई उपनगर" जिल्ह्यात शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यास व त्यासाठी खालील पदाच्या निर्मितीस प्रथमतः दि. २८.२.९७ रोजी संपणाऱ्या कालावधीपर्यंत मान्यता देण्यात येत आहे. तसेच ग्रंथालय स्थापनेसाठी रु. १.०० लाख [रुपये एक लाख फक्त] एकदाच खर्चास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतन | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १] | ग्रंथपाल वर्ग-२ | रु. २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | १ |
| २] | तांत्रिक सहाय्यक वर्ग-२ | रु. १६४०-६०-२६००-दरो-७५-२९०० | १ |
| ३] | मुख्य लिपिक वर्ग-३ | रु. १४००-४०-१६००-दरो-५०-२३००-६०-२६०० | १ |
| ४] | वरिष्ठ लिपिक वर्ग-३ | रु. १२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० | १ |
| ५] | कनिष्ठ लिपिक वर्ग-३ | रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० | १ |
| ६] | शिपाई वर्ग-४ | रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ |
| ७] | चौकीदार-वर्ग-४ | रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ |
| | | एकूण : | ७ पदे |

कृ.मा.प.

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन उपरोक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी.

३. प्रस्तुत खर्च मागणी क्र. डब्ल्यू-४"२२०५-कला व संस्कृति -१०५- सार्वजनिक ग्रंथालये "या लेखाशिर्षाखालील चालू वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३५९/व्यय-५, दिनांक १३. ६. ९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ. चिं. तिरोडकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१] ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२] सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
३] महालेखापाल-१, मुंबई
४] निवासी लेखा अधिकारी, मुंबई
५] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६] नियोजन विभाग
७] वित्त विभाग [अर्थसं/व्यय-५]
८] उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग [साशि-१]
९] निवड नस्ती साशि-५

मुंबई उपनगर जिल्हा शासकीय ग्रंथालयाची स्थापना करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शुध्दिपत्र क्रमांक:एलआयबी १०९५/३८३२/[२४/९५]/साशि-५
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२

दिनांक:- १९ मार्च,१९९७.

वाचा:- शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक:एलआयबी १०९५/३८३२/[२४/९५]/साशि-५
दिनांक: २.११.१९९६.

शुध्दिपत्र :- उपरोक्त शासन निर्णयातील परि.३ मधील दुस-या ओळीतील "सार्वजनिक ग्रंथालये" या शब्दापुढे "पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[दोन्ही] शासकीय मध्यवर्ती विभागीय व जिल्हा ग्रंथालये [२२०५०२८९]" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ कुं. गु. बगाडे ]
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
१] ग्रंथालय संचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२] ग्रंथपाल,शासकीय जिल्हा ग्रंथालय,मुंबई उपनगर,मुंबई.
३] महालेखापाल-१,मुंबई.
४] निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
५] अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
६] नियोजन विभाग
७] वित्त विभाग[अर्थसं/व्यय-५]
८] उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग[साशि-१]
९] निवड नस्ती [साशि-५]

पार्सेकर १९.३